# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०२२

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### गडचिरोली तसेच यवतमाळ जिल्हयातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात वॉटर प्युरीफायर खरेदीत झालेला गैरव्यवहार

**(१) २७७०६ (१५-०६-२०२१). श्री.धर्मरावबाबा आत्राम (अहेरी), डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गडचिरोली जिल्हयातील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, भामरागड, अहेरी व गडचिरोली तसेच यवतमाळ जिल्हयातील पांढरकवडा प्रकल्प कार्यालयाने माहे मे, २०२० मध्ये वा त्यादरम्यान जेम पोर्टलवर निविदा देवून आर्थिक फायद्यासाठी कंत्राटदाराशी संगनमत करुन कंपनी दरापेक्षा तिप्पट किंमतीने वॉटर प्युरीफायर खरेदी करुन शासनाचे अंदाजे ६ कोटी रुपयाचे आर्थिक नुकसान केल्याची बाब माहे जून, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाचे दिनांक ४ मे २०२० च्या परिपत्रकानुसार प्राधान्यक्रम नसलेल्या विभागांना कोणत्याही खरेदीच्या प्रस्तावांना मान्यता देता येणार नाही अथवा प्रशासकीय मान्यता प्राप्त असली तरी निविदा करता येणार नाही असे स्पष्ट आदेश असतांनाही शासन निर्णयाकडे हेतूपुरस्सर दुर्लक्ष करुन निवीदा प्रसिध्द करण्यात आल्या, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच, परराज्यातील निविदाधारकांशी संगनमत करून, महाराष्ट्र राज्यातील निविदाधारकांना तांत्रीक तपासणीमध्ये अपात्र ठरवून भोपाळ, मध्यप्रदेश, दिल्ली येथील कंत्राटदाराच्या ३ निविदा पात्र करुन दिल्लीच्या पुरवठाधारकाला एकूण १४६ नग वॉटर प्युरीफायरचा पुरवठा करण्याचे आदेश दिनांक ३ जून २०२० रोजी वा त्यासुमारास देण्यात आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले त्यानुषंगाने निर्देशाचे पालन न करता नियमबाह्य निविदा प्रक्रिया पूर्ण केल्यामुळे निविदा प्रकिया रद्द करुन संबंधीत अधिकाऱ्यांविरुध्द कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२१-१२-२०२१) :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे.
(४) प्राप्त तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी करण्यात आलेली असून त्याबाबतचा चौकशी अहवाल शासनास प्राप्त झाला असून त्याची छाणनी करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा जिल्ह्यातील नादुरुस्त ट्रान्सफार्मर दुरुस्त करण्याबाबत**

**(२) ३२२८७ (११-०८-२०२१). श्रीमती श्वेता महाले (चिखली) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागातील कृषी गावठाण आणि पाणीपुरवठा योजनेचे शेकडो ट्रान्सफार्मर नादुरुस्त झालेले असल्याने विद्युत पुरवठा अनेक दिवस बंद असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, वीज बिलाच्या वसुलीसाठी ८० टक्के वीज वसुली झाल्याशिवाय नादुरुस्त ट्रान्सफार्मर अहवाल सादर करू नये अशा सूचना बुलढाणा वीज वितरण कंपनीचे अधीक्षक अभियंता तसेच कार्यकारी अभियंता यांनी दिलेले असल्याने जिल्हाभरातील नादुरुस्त ट्रान्सफार्मर चा अहवाल सादर होत नसल्याने नादुरुस्त ट्रान्सफार्मर लवकर दिले जात नाही हे खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी नादुरुस्त ट्रान्सफार्मर तातडीने दुरुस्त करुन देऊन नादुरुस्तीचा अहवाल देऊ नये अशा सूचना देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २५ मे, २०२१ रोजी वा त्यासुमारास जिल्हाधिकारी बुलढाणा यांच्याकडे केली हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने चौकशी करुन नादुरुस्त ट्रान्सफार्मवर दुरुस्त करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. नितिन राऊत (२५-०१-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.१२१/ऊर्जा-५, दिनांक १८.१२.२०२० मधील तरतूदीनुसार नादुरुस्त रोहित्रावरील ८०% ग्राहकांनी त्यांचे चालू बिल भरल्याशिवाय नादुरुस्त रोहित्र बदलण्यात येणार नाही अशा सूचना आहेत.
(३) अश्या आशयाचे पत्र महावितरण कार्यालयास प्राप्त झालेले नाही.
(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्य शासनामार्फत राबविण्यात आलेल्या नैसर्गिक धोके सौम्यीकरण पथदर्शी प्रकल्पात रायगड जिल्हयातील दरडग्रस्त गावांचे पुनर्वसन करण्याबाबत**

**(३) ३२४४५ (१२-०१-२०२२). श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.महेश बालदी (उरण), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनामार्फत राबविण्यात आलेल्या नैसर्गिक धोके सौम्यीकरण पथदर्शी प्रकल्पात रायगड जिल्हयातील माहे जुलै, २००२ च्या अतिवृष्टीनंतर ८४ गावांचा दरडग्रस्त गावांमध्ये समावेश करण्यात आला असून आता दरडग्रस्त गावांची संख्या १०३ वर पोहचली असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयातील १०३ दरडग्रस्त गावांपैकी ९ गावे अतिधोकादायक, ११ गावे धोकादायक व ८३ गावे सौम्यधोकादायक असल्याचे निर्दशनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, संभाव्य दरडग्रस्त गावांचे पुनर्वसन करण्याचा प्रस्ताव तयार करण्यात आला असून निधी अभावी सदर प्रस्ताव प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून रायगड जिल्हयातील दरडग्रस्त गावांचे पुनर्वसन करण्याच्या दृष्टीने तातडीने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१०-०२-२०२२) :** (१) होय, खरे आहे.

(२) होय, खरे आहे.

(३) नाही.

(४) तथापि, रायगड जिल्हयातील दरडग्रस्त असलेल्या तळीये, केवनाळे व साखर (सुतारवाडी) या गावांच्या कायमस्वरुपी पुनर्वसनाकरीता रू. १३.२५ कोटी व तात्पुरत्या पुनर्वसनाकरीता रु.२५.७९ लक्ष इतका निधी दि.०८/०२/२०२२ व दि.०८/०२/२०२२ रोजीच्या शासन निर्णयांन्वये उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबई जिल्हा मध्यवर्ती (मुंबै) सहकारी बँकेत झालेली अनियमितता**

**(४) ३२४५२ (१२-०१-२०२२). श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई जिल्हा मध्यवर्ती (मुंबै) सहकारी बँकेत गेली पाच वर्षात संगणीकरण देखभाल खर्च, हार्डवेअर खरेदीत अनिमयमितता, स्थावर व भाडे करारावरील मालमत्तांच्या दुरुस्ती व नुतनीकरण, वसूल न झालेले कर्ज आदि प्रकरणात अनियमिततेची गंभीर दखल घेत राज्य

शासनाने सहकार कायद्याच्या कलम ८३ नुसार ३ महिन्यात चौकशी अहवाल देण्याचे आदेश विभागीय सह निबंधक यांना दिनांक २३ सप्टेंबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी सहनिबंधकाने शासनास याबाबतचा अहवाल सादर केला आहे काय,
(३) असल्यास, अहवालातील निष्कर्ष काय आहेत त्यानुसार संबंधित दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (११-०२-२०२२) :** (१) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई २ पूर्व उपनगरे यांची विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, मुंबई विभाग, मुंबई यांनी दि. २२.०९.२०२१ रोजीच्या आदेशान्वये चौकशी अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली असून चौकशी अधिकारी यांना बँकेचे झालेले आर्थिक नुकसान यासंबंधी सखोल चौकशी करुन विहीत मुदतीत अहवाल सादर करण्यास आदेशीत केलेले आहे.
(२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबै जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने वाहन कर्जवसुलीचे हप्ते वसूल केले नसल्यामुळे व्यवस्थापकाला निलंबित केल्याबाबत

**(५) ३२६१९ (१२-०१-२०२२). श्री.मंगेश कुडाळकर (कुर्ला) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात लॉकडाऊन च्या काळात कर्जवसूली न करण्याचे न्यायालय व सरकारने बँकांना आदेश दिले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबै जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने वाहन कर्ज वसूलीचे हप्ते वसूल न केल्याने व्यवस्थापकाला निलंबित करुन त्याची ग्रॅच्युईटीची रक्कम जप्त केली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त बँकेच्या व्यवस्थापकाने आत्मदहनाचा इशारा बँक व्यवस्थापनाला देऊन अन्याया विरोधात न्याय मिळवून देण्याबाबत तसेच याप्रकरणी चौकशी व्हावी अशी लेखी मागणी निवेदनाव्दारे मा.मुख्यमंत्री याच्याकडे करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याप्रकरणी मुंबै जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडून खुलासा मागवून शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०९-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या अहवालानुसार लॉकडाऊनपुर्वी थकीत

असलेल्या कर्जदारांकडून थकबाकी वसुली करू नये अशा प्रकारचे आदेश दिलेले नव्हते. निलंबित व्यवस्थापक यांची थकीत वाहन तारण कर्ज नियमीत करण्याकामी व थकबाकी वसुलीकामी दि. ०३/१२/२०१८ रोजी नियुक्ती करण्यात आली होती, मात्र त्यांनी थकीत वाहन कर्जाची प्रभावीपणे वसुली न केल्यामुळे बँकेच्या अनुत्पादीत कर्जात वाढ होत जाऊन बँकेचे रु. ८१८.४२ लाख इतके नुकसान झाले होते. याबाबत त्यांनी केलेला खुलासा असमाधानकारक आढळला. तसेच खातेनिहाय चौकशी अधिका-यांच्या अहवालानुसार ते दोषी आढळल्यामुळे त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात आले. त्यांच्यामुळे बँकेचे रु. ८१८.४२ लाखाचे नुकसान झाल्यामुळे त्यांची ग्रॅच्यूईटीची रक्कम जप्त करण्यात आली.

निलंबित व्यवस्थापक यांना पोलीस यंत्रणेद्वारे आत्मदहनापासून परावृत्त करण्यात आलेले आहे. तसेच निलंबनाची बाब ही अंतर्गत प्रशासकीय बाब असल्याने त्याविरोधात सक्षम प्राधिकरणाकडे दाद मागणे उचित होईल, असे कळविण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात कोरोनामुळे मृत झालेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना ५० हजार रुपयांची मदत देण्याच्या निर्णयाबाबत**

**(६) ३२८३८ (१२-०१-२०२२). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.अमित साटम (अंधेरी पश्चिम), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (तुळजापूर), श्री.पराग शाह (घाटकोपर पूर्व), श्री.सुनील राणे (बोरीवली), श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व), श्री.मिहीर कोटेचा (मुलुंड), श्री.समाधान अवताडे (पंढरपूर), श्री.राहूल कुल (दौंड), श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.किशोर जोरगेवार (चंद्रपूर), श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), अॅड.राहुल ढिकले (नाशिक पूर्व), श्री.सिध्दार्थ शिरोळे (शिवाजीनगर), श्री.सचिन कल्याणशेट्टी (अक्कलकोट), श्री.संतोष दानवे (भोकरदन), श्री.गोवर्धन मांगीलाल शर्मा (ऊर्फ) लालाजी (अकोला पश्चिम), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.चेतन तुपे (हडपसर), श्री.कुमार आयलानी (उल्हासनगर), श्री.मोहनराव हंबर्डे (नांदेड दक्षिण), श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) देशातील कोरोना बळीच्या कुटुंबियांना एक रकमी ५० हजार रुपयांची मदत करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला असून त्याबाबतचे सविस्तर दिशा निर्देशही सर्व राज्यांसाठी जारी केले असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निधी नसल्याने आणि नियमातील स्पष्टतेच्या अभावी राज्याकडून जिल्हा स्तरावर कोणतेच आदेश जारी झाले नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, कोविडचा सामाना करण्यासाठी केंद्र सरकारने माहे मे महिन्यांतच एसडीआरएफ साठी सुमारे ८ हजार कोटींचा निधी विविध राज्यांसाठी आगाऊ वितरित केला असतानाही

राज्य शासनाकडून कोणतेच पुढील निर्देश झाले नसल्यामुळे सदर योजना कार्यान्वित होण्यास विलंब होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन कोरोना काळात मृत्यू पावलेल्या कोरोनाबळींच्या कुटुंबियांना तातडीने आर्थिक मदत करण्यासाठी सदर योजना प्रभावीपणे राबविण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विजय वडेट्टीवार (१८-०२-२०२२) :** (१) खरे आहे,
(२) खरे नाही,
(३) खरे नाही,

राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या ५०% म्हणजेच रू.१७१८.४० कोटी एवढ्या मर्यादेत निधी कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता वापरण्याचे केंद्र शासनाने निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्याकरिता करावयाच्या उपाययोजनांसाठी रू.८६३४८.१० लक्ष एवढा निधी अद्यापपर्यंत वितरीत करण्यात आला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दि.०४.१०.२०२१ रोजीच्या आदेशाप्रमाणे तर कोव्हीड-१९ च्या आजारामुळे मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या निकट नातेवाईकास सानुग्रह सहाय्य देण्याकरिता शासन निर्णय, दि.२६.११.२०२१ अन्वये ऑनलाईन संगणकीय कार्यपध्दती विहित करण्यात आली असून त्यानुसार प्राप्त अर्जापैकी अद्यापपर्यंत १,१४,७७० इतक्या मृत व्यक्तींच्या जवळच्या नातेवाईकांस रू.५० हजार इतके सानुग्रह सहाय्य देण्याकरिता रू.५७०.०० कोटी इतका खर्च करण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## शासकीय आश्रम शाळेत आदिवासी विद्यार्थ्यांचा झालेला मृत्यू

**(७) ३२९८७ (२५-११-२०२१). श्री.लहू कानडे (श्रीरामपूर), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आदिवासी विकास विभागांतर्गत ठाणे, नाशिक, अमरावती व नागपूर हे चार अपर आयुक्त कार्यालये व २९ एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालये कार्यरत असून या एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालयांतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रात ४१२ तर आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर १४० आश्रमशाळा आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१८-१९ ते २०२० - २१ या तीन वर्षात नाशिक विभागात १६६, ठाणे विभागात ८३, अमरावती विभागात ५१, नागपूर विभागात ५३ असे एकूण ३५३ विद्यार्थ्यांचा मृत्यु झाले, हे खरे आहे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले, व त्याअनुषंगाने संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा येत आहे, तसेच मृत्य विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना शासनाने कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शासनामार्फत कोणत्या उपाययोजना वा उपक्रम राबविण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१७-१२-२०२१) :** (१) आदिवासी विकास विभागातंर्गत ठाणे, नाशिक, अमरावती व नागपूर हे चार अपर आयुक्त कार्यालये आहेत. तसेच ३० एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालये कार्यरत आहेत. सदर प्रकल्पांतर्गत आदिवासी उपयोजना क्षेत्रात ३७४ तर आदिवासी उपयोजना क्षेत्राबाहेर १२३ अशा एकूण ४९७ शासकीय आश्रमशाळा कार्यरत आहेत.
(२) हे खरे आहे.

सन २०१८ ते सन २०२१ या तीन वर्षात नाशिक विभागात १६६, ठाणे विभागात ८३, अमरावती विभागात ५३ व नागपूर विभागात ५१ असे एकूण ३५३ विद्यार्थ्यांचा अपघाती, आजारपण, सर्पदंश अशा विविध कारणाने मृत्यु झालेला आहे.
(३) विद्यार्थी मृत्यु प्रकरणी दोषी असलेल्या ७ कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे.

तसेच मृत्यु पावलेल्या ३५३ विद्यार्थ्यांपैकी ३३१ विद्यार्थ्यांच्या पालकांना सानुग्रह अनुदान अदा करण्यात आले आहे. उर्वरित १९ विद्यार्थ्यांच्या पालकांना सानुग्रह अनुदान अदा करण्याची कार्यवाही सुरू आहे व ३ विद्यार्थी बिगर आदिवासी असल्याने या ३ विद्यार्थ्यांना सानुग्रह अनुदान अदा केले नाही.
(४) व (५) शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या मृत्युंचा आढावा घेणे, सामाजिक वैद्यकीय विष्लेषण व जबाबदारीने प्रत्यक्ष कार्यवाही त्वरीत होणेसाठी दि.२८/१२/२०१६ शासन निर्णयान्वये विविध समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीमार्फत विद्यार्थी मृत्युची चौकशी करण्यात येऊन दोषी आढळलेल्या कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्यात येते.

आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची शासनाने नियुक्त केलेल्या फिरते आरोग्य तपासणी पथकामार्फत, प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत नियमित वैद्यकीय तपासणी केली जाते. आश्रमशाळेवर प्राथमिक औषधोपचारासाठी किट्स पुरवली जाते. तसेच आजारी विद्यार्थ्यांना नजीकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात/ग्रामीण रूग्णालयात वैद्यकीय उपचार केला जातो. तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या सल्यानूसार पुढील औषधोपचार केला जातो. तसेच जीवन कौशल्य कार्यक्रमातंर्गत विद्यार्थ्यांच्या आरोग्यविषयी सूचना दिल्या जातात. तसेच वॉश कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना शौचालय वापराबाबतही मार्गदर्शन करण्यात आले आहे. तसेच शौचालये व स्नानगृहे यांची दुरूस्ती व बांधकामे करण्यात आली आहेत.

डॉ. साळुंखे समितीने सदर अहवालात १८ अल्पकालीन व ९ दिर्घकालीन अशा एकूण २७ शिफारशी केल्या आहेत. त्यापैकी जिल्हाधिकारी स्तरावर आढावा गटाची स्थापना, वैद्यकीय सामाजिक विश्लेषण समिती आढावा पथकाची स्थापना, जिल्हाधिकारी स्तरावर विद्यार्थी मृत्यू त्रैमासिक आढावा समिती स्थापना, जेवणाच्या वेळेत बदल, पालकांचे संमतीपत्र, वैद्यकीय सेवेविषयी फलक लावणे, किमान क्रीडा सुविधा, मादक पदार्थ सेवन मनाई, तातडीने वैद्यकीय निधी देखभाल दुरूस्ती इत्यादी बाबत कार्यवाही करण्यात आली आहे.

---

**चाकुर तालुक्यातील निराधारांच्या प्रलंबित मागण्याबाबत**

**(८) ३३०५१ (१२-०१-२०२२). श्री.बाबासाहेब पाटील (अहमदपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चाकूर तालुक्यातील निराधार योजनेच्या बऱ्याच मागण्या प्रलंबित असून या मागण्या मंजूर करुन निराधारांना आर्थिक मदतीचा लाभ मिळवून दयावा अशी मागणी संबंधित लोकप्रतिनिधीनी दिनांक १ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास उपविभागीय अधिकारी तसेच तहसिलदार यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) निराधार योजनेच्या कोणकोणत्या मागण्या प्रलंबित आहेत व केव्हांपासून, तसेच आर्थिक मदत न मिळाल्याने ग्रामस्थाना अनेक अडचणीचा सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी या मागण्यां त्वरीत मान्य करुन गरीब निराधार लोकांना या योजनेचा लाभ मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१०-०२-२०२२) :** (१) व (२) हे खरे नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पतसंस्थातील ५० हजारापर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण देण्याबाबत**

**(९) ३३१७८ (१२-०१-२०२२). श्रीमती यामिनी यशवंत जाधव (भायखळा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पतसंस्थातील ५० हजारापर्यंतच्या ठेवींना विमा संरक्षण देण्याबाबतचा प्रस्ताव सहकार विभागाने दिनांक २४ ऑक्टोंबर,२०२१ रोजी वा त्या सुमारास तयार करून राज्य मंत्रिमंडळाच्या मंजुरीसाठी पाठविला आहे हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावास मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रस्ताव मंजूर झाल्यास त्याचा जनतेस फायदा होण्याच्या दृष्टीने शासन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०२-०३-२०२२) :** (१) व (२) नाही.

(३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १४४-२२अ नुसार तरलता निधीसाठी अंशदान रक्कम ठरविणे व त्याचा विनियोग कशा प्रकारे करावा याबाबतचे नियम तयार करण्याचे अधिकार नियामक मंडळाला देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने नियामक मंडळाच्या स्तरावरुन पुढील कार्यवाही सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## आदिवासी विकास विभागांतर्गत बाह्यस्त्रोताने नियमबाह्य कर्मचाऱ्यांच्या नेमणूका केल्याबाबत

**(१०) ३३२८३ (१२-०१-२०२२). श्री.शिरीषकुमार नाईक (नवापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागांतर्गत क्वेस्ट काळा घोडा, मुंबई या भाड्याच्या इमारतीमधे बाह्यस्त्रोताने नियमबाह्य कर्मचाऱ्यांच्या नेमणूका करण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास विभागाने या भाडेतत्वावर घेतलेल्या इमारतीसाठी कोट्यवधी रुपये इमारत भाडे व बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांसाठी लाखो रुपये वेतन देण्यात येतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्याची आर्थिक परिस्थिती पाहता अशा प्रकारे भाडेतत्वावर इमारत भाडे बंद करण्याबाबत व बाह्यस्त्रोतातील कर्मचाऱ्यांच्या नेमणूका रद्द करण्याबाबत शासनाकडे तक्रारी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नियमबाह्य नेमणुका रद्द करण्याबात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१७-०१-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

भाडेतत्वावर घेतलेल्या इमारतीसाठी रु.८,४५,७८३/- इतके मासिक भाडे अदा करण्यात येत आहे. तसेच, क्वेस्ट कार्यालयातील सर्व कार्यरत तज्ञ व्यक्तीच्या (बाह्यस्त्रोत कर्मचारी) मानधनासाठी रु.६,०५,६२०/- इतका मासिक खर्च करण्यात येत असल्याचे आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी कळविले आहे.

(३) हे खरे आहे.

(४) आदिवासी विकास विभागाची कार्यकक्षा ही वैविध्यपूर्ण असून जिल्हा वार्षिक योजना, राज्य योजना, केंद्र योजना, विविध १६ मंत्रालयीन प्रशासकीय विभागांना निधी वितरीत करणे ज्यामध्ये शिक्षण, आरोग्य, कृषि, रोजगार, पायाभूत सुविधा, पशुसंवर्धन, ऊर्जा, उद्योग, महसूल व वने, जलसंपदा व जलसंधारण इत्यादी क्षेत्रांसाठी निधीचा विनियोग व फलनिष्पती तपासण्यासाठी तसेच नियोजन व संनियंत्रणासाठी क्वेस्ट उपकेंद्र सुरु करण्यात आलेले आहे. सदर उपकेंद्र हे केंद्रिय योजनेतून सुरु करण्यात आलेले असून ते केंद्र शासनाकडून मंजूर केंद्रिय प्रकल्पाचा भाग असून या केंद्राचा आवर्ती खर्च सुध्दा केंद्र शासनाकडून मंजूर व वितरीत करण्यात येतो.

शासकीय कामकाजात नाविन्यपूर्ण योजनांचे संकल्पन करुन त्यांचे देखरेख व संनियंत्रण करुन योजनांमधून फलनिष्पती प्राप्त करुन घेण्यामध्ये क्वेस्ट कार्यालयाचे योगदान महत्वपूर्ण असल्याने क्वेस्ट कार्यालय सुरु ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पेवे उंबरशेत (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) येथील शेती संरक्षणाकरिता खारभूमी बंधारा बांधण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(११) ३३३०८ (१२-०१-२०२२). श्री.योगेशदादा कदम (दापोली) :** सन्माननीय **खार जमिनी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पेवे उंबरशेत (ता.मंडणगड, जि.रत्नागिरी) येथील शेती संरक्षणाकरिता खारभूमी बंधारा बांधण्याचा प्रस्ताव शासन स्तरावर प्रलंबित असल्याचे माहे सप्टेबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्ताव शासनाकडे प्रलंबित असण्यामागील कारणे काय आहेत, तसेच सदरहु प्रस्तावावर कधीपर्यंत अंमलबजावणी होणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (०४-०३-२०२२) :** (१) होय. खरे आहे.

पेवे उंबरशेत खारभूमी ता.मंडणगड, जि.रत्नागिरी या योजनेचे अंदाजपत्रकाबाबत शासनाने उपस्थित केलेल्या शेऱ्यांची माहे जानेवारी, २०२२ मध्ये पूर्तता करून प्रस्ताव प्राप्त झाला आहे.

(२) सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात शेतक-यांना मिळणा-या कर्जाच्या रक्कमेत वाढ करण्याबाबत**

**(१२) ३३३२८ (१२-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शेतक-यांना मिळणा-या कर्जाच्या रक्कमेत वाढ करुन मिळणेबाबत मा.मुख्यमंत्री, यांना लोकप्रतिनिधींनी दिनांक २० जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवदेनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०९-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मधापुरी, राजूरा पावरीवाडा, जोन्धनखेड, लालगोटा, हलखेडा, धुळे पावरीवाडा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) या गावांना आदिवासी विभागात समाविष्ट करण्याबाबत**

**(१३) ३३३३५ (१२-०१-२०२२). श्री.चंद्रकांत (भाऊ) निंबाजी पाटील (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मधापुरी, राजूरा पावरीवाडा, जोन्धनखेड, लालगोटा, हलखेडा, धुळे पावरीवाडा (ता.मुक्ताईनगर, जि.जळगांव) या गावांना आदिवासी विभागात समाविष्ट करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक १२ जुलै, २०२१ रोजी वा त्यासुमारास आदिवासी विकास मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदरहू गावांना आदिवासी विभागात समाविष्ट करुन घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०८-०२-२०२२) :** (१) होय.
(२) मा.राष्ट्रपती महोदय यांच्याद्वारा महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित क्षेत्राबाबत दि. २ डिसेंबर १९८५ रोजी अधिसूचना काढण्यात आलेली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित क्षेत्राची पुर्नरचना करणे आवश्यक आहे. अनूसूचित क्षेत्रात गावांचा समावेश करण्यासाठी केंद्र शासनाने काही निकष निश्चित केले आहेत. सदर निकषांनुसार आयुक्त,आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यामार्फत राज्याच्या अनुसूचित क्षेत्राच्या पुर्नरचनेचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## गेवराई तालुक्यात गोदावरी नदीला आलेल्या पूरामुळे पाण्यात बुडून नऊ जणांचा झालेला मृत्यू

**(१४) ३३३४४ (१२-०१-२०२२). श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अतिवृष्टी व जायकवाडी धरणातील पाण्याचा विसर्ग यामुळे गोदावरी नदीला आलेल्या पूरामुळे पूराच्या पाण्यात बुडून गेवराई तालुक्यातील राक्षसभुवन, मिरगांव, संगमजळगांव व सुरळेगांव येथील नऊ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पूराच्या पाण्यामध्ये वाहून गेल्यामुळे मयत झालेल्यांच्या कुटूंबियांना व नैसर्गिक आपत्तीमुळे मयत झालेल्यांना शासनाकडून दिली जाणारी आपत्कालीन मदत अद्यापपर्यंत मिळाली नसल्याचेही निदशर्नास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन नुकसानग्रस्तांना भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१८-०२-२०२२) : (**१) हे खरे नाही, अतिवृष्टीमुळे किंवा जायकवाडी धरणातील पाण्याच्या विसर्गामुळे मृत्यू झालेले नाहीत.

(२) ,(३) व (४) नैसर्गिक आपत्तीमुळे मृत्यू झालेला नसल्याने या प्रकरणी मदत देण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील शासकीय वसतिगृहे बंद असल्याबाबत**

**(१५) ३३३८० (१२-०१-२०२२). श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर (जिंतूर), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्रीमती माधुरी मिसाळ (पर्वती), श्रीमती श्वेता महाले (चिखली), श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा), श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट), श्री.मंगेश चव्हाण (चाळीसगाव), श्री.संभाजी पाटील-निलंगेकर (निलंगा), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात कोरोना प्रादुर्भाव कमी होताच विविध क्षेत्र सुरू करण्यात आले असताना राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागाअंतर्गत प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी असलेली शासकीय वस्तीगृह हे अद्याप बंद असल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दीड वर्षापासून शासकीय वस्तीगृहे बंद असल्याने दारिद्र्यरेषेखालील विद्यार्थ्यांवर खोली घेऊन राहण्याची वेळ आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, वस्तीगृहात राहणा-या अभियांत्रिकी व परिचारिका विद्यार्थीनींचीही हेळसांड होत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, तातडीने हे वस्तीगृहे सुरू करून विद्यार्थ्यांना दिलासा देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय?

**श्री. धनंजय मुंडे (१५-०२-२०२२) :** (१) होय.

(२) व (३) नाही. टाळेबंदीच्या कालावधीमध्ये शाळा, कॉलेज व विद्यापीठातील शिक्षण दूरदृश्यप्रणालीव्दारे सुरू होते.

(४) शालेय शिक्षण विभागाच्या शासन निर्णय दि. २४.९.२०२१ मधील तरतुदीनुसार शाळा सुरू करण्यात आल्याने सामाजिक न्याय विभागाने दि. ४ ऑक्टोबर, २०२१ पासून राज्यातील वसतिगृहे सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**चिंचाळा (ता.मेहकर, जि.बुलढाण) येथील अनुदानित जिजामाता आदिवासी आश्रम शाळेतील ११ वी १२ वीचे वर्ग बंद असल्याबाबत**

**(१६) ३३५८२ (१२-०१-२०२२). श्री.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिंचाळा (ता.मेहकर, जि.बुलढाण) येथील अनुदानित जिजामाता आदिवासी आश्रमशाळा मधील ११ वी १२ वीचे वर्ग शाळेच्या संस्था चालकांच्या ठरावामुळे शासनाने बंद केल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन आश्रमशाळा मधील अकरावी व बारावीचे वर्ग सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०२-०३-२०२२)** : (१) व (२) जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळ मेहकर संचलित जिजामाता अनुदानित उच्च माध्यमिक आदिवासी आश्रमशाळा, चिंचाळा ता. मेहकर जि. बुलढाणा येथे सुरु होती. संस्थेने आश्रमशाळेत विद्यार्थी पटसंख्या उद्दिष्ट पूर्ण होत नाही, होतकरु विद्यार्थी मिळत नाही तसेच संबंधित कर्मचाऱ्यांच्या असहकार्यामुळे सदर उच्च माध्यमिक आश्रमशाळा (इ.११वी व इ. १२ वी) कायमस्वरुपी बंद करण्याबाबत ठराव केला. संस्थेस उच्च माध्यमिक शाळा चालविण्यास स्वारस्य नसल्याने शासनाने दि. २७.०९.२०२१ च्या शासन निर्णयान्वये सदर उच्च माध्यमिक आश्रमशाळा (इ.११ वी व इ.१२ वी चे वर्ग) सन २०२१-२२ या शैक्षणिक वर्षापासून कायमस्वरुपी बंद करण्यास मान्यता दिली.

शासनाच्या धोरणाप्रमाणे या आश्रमशाळेतील इ. ११ वी व इ. १२ वी तील सर्व विद्यार्थ्यांचे पालकांच्या संमतीनुसार अन्य निवासी शासकीय व अनुदानित आश्रमशाळेमध्ये समायोजन करण्यात आले आहे. उच्च माध्यमिक शिक्षकांचे अन्य आश्रमशाळेत रिक्त पदी समायोजन करण्याबाबत नमुद करण्यात येते की, सदर कर्मचा-यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपिठात याचिका क्र. ४०६५ /२०२१ दाखल केली असून यावर मा. उच्च न्यायलयाने दि. १३.१०.२०२१ रोजी पुढील आदेशापर्यंत या कर्मचा-यांचे अन्यत्र समायोजन करु नयेअसे आदेश दिले आहेत. त्यामुळे या शिक्षकांच्या समायोजनाची कार्यवाही प्रलंबित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्हयातील संजय गांधी व इंदिरा गांधी आस्थापवनेवर गट ब, क व ड संवर्गातील पदे मंजूर करण्याबाबत

**(१७) ३३६०२ (१२-०१-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील नवनिर्मित तालुके बल्लारपूर, सावली, पोंभुर्णा, कोरपना व जिवती या तालुक्यातील संजय गांधी व इंदिरा गांधी आस्थापनेवरील गट ब, क व ड संवर्गातील पदे मंजूर करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी महसुल मंत्री यांना दिनांक २८ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर पदे मंजुर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१०-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.
(२) विशेष सहाय्य योजनांच्या अंमलबजावणीसाठी
निर्माण करण्यात आलेल्या अस्थायी पदांचा आढावा घेऊन आकृतीबंध तयार करण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नांदेड जिल्हयात अतिवृष्टीमुळे नदी-नाल्यावरील पूल नादुरुस्त झाले असल्याबाबत**

**(१८) ३३६३७ (१२-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नांदेड जिल्हयामध्ये माहे जुलै ते सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान झालेल्या अतिवृष्टीमुळे जिल्हयामध्ये मोठ्या प्रमाणात शेतकऱ्यांच्या शेतीचे नुकसान झाले असून अनेक गावांमध्ये घरांची पडझड झाली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जिल्हयामध्ये अनेक ओहळ व नदी-नाल्यांवरील पूल हे तुटलेले व खचलेले असल्याने रहदारीस मोठ्या प्रमाणात धोका होत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन ओहळ व नदी-नाल्यावरील तुटलेले पुल दुरुस्त करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१८-०२-२०२२) :** (१) खरे आहे,
(२) खरे आहे.
(३) नांदेड जिल्हयात माहे जुलै, ऑगस्ट-सप्टेंबर, २०२१ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे लहान/मोठे पूल व नळकांडी पूल क्षतिग्रस्त झाले आहेत. सदर क्षतिग्रस्त पूल व पुलमो-यांची तात्पुरती दुरूस्ती करून रस्ते वाहतुकीयोग्य करण्यात आले आहेत. सदर क्षतीग्रस्त पुलांची दुरूस्ती/पुर्नबांधणी करण्यासाठी निधी मागणीचा प्रस्ताव संबंधित क्षेत्रीय कार्यालयांनी सार्वजनिक बांधकाम विभागास सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नायगाव (जि.नांदेड) येथील शेतकऱ्यांना बँकांकडून कर्ज मिळत नसल्याबाबत**

**(१९) ३३६५४ (१२-०१-२०२२). श्री.राजेश पवार (नायगांव) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नायगाव (जि.नांदेड) येथील शेतक-यांची कर्जाची मागणी बँकेकडून पूर्ण होत नसून वारंवार बँकेत शेतकरी जाऊनही शेतक-यांना कर्ज मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सविस्तर माहिती घेतली असता एका बँकेत ६ हजारच्या आसपास खातेदार असल्यामुळे त्यामुळे बँकेला शेतक-यांना कर्ज देणे शक्य होत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासन स्तरावर त्याकरीता बँकेच्या शाखा वाढविणे गरजेचे असून यावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०९-०२-२०२२) :** (१) व (२) नांदेड जिल्हयातील नायगाव मतदारसंघात जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, व्यापारी व खाजगी बँका व ग्रामीण बँकांना खरीप हंगामात रु. १५४८.०० लाख इतके पीककर्ज वाटपाचे उद्दीष्ट देण्यात आले होते. त्यापैकी १,८३,६१७ सभासदांना रु. १३६०.६२ लाखाचे पीककर्ज वाटप करण्यात आले आहे. झालेले कर्जवाटप उद्दीष्टाच्या ६६.०२ टक्के इतके आहे.
(३) नांदेड जिल्हयातील नायगाव मतदारसंघात नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या एकूण ९ शाखा असून भौगोलिक व प्रशासकीयदृष्ट्या शाखा पुरेश्या असलेबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादीत, नांदेड यांनी कळविले आहे. तसेच इतर राष्ट्रीयकृत व ग्रामीण बँकांच्या एकूण १८ शाखा आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**एमएसएमई युनिटकडून लघु उद्योगांना कोळसा उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(२०) ३३७४६ (१२-०१-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) एमएसएमई युनिटकडून लघु उद्योगांना कोळसा उपलब्ध करून देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी बल्लारपूर यांनी २७ ऑगस्ट,२०२१ रोजी वा त्यासुमारास उद्योग मंत्री यांना लेखी निवेदन सादर केली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. सुभाष देसाई (२५-०२-२०२२) :** (१) होय, खरे आहे.
(२) राज्यातील लघू, मध्यम व इतर उपक्रमांना शासन नियुक्त यंत्रणेमार्फत कोळसा वाटप करण्यासंदर्भात दिनांक १२/०७/२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये निर्गमित मार्गदर्शक तत्त्वांमध्ये दिनांक २१/०१/२०२२ च्या शासन निर्णयान्वये सुधारणा करण्यात आल्या आहेत. तसेच राज्यातील लघू, मध्यम व इतर उद्योग घटकांना कोळसा वितरण करण्याकरीता सन २०२२-२३ व सन २०२३-२४ या दोन वर्षाकरीता शासन नियुक्त यंत्रणा (SNA) म्हणून महाराष्ट्र राज्य खनिकर्म महामंडळ, नागपूर यांची नियुक्ती करण्यात आलेली असून त्यानुषंगाने पुढील कार्यवाही करण्याबाबत महाव्यवस्थापक, कोल इंडिया लिमिटेड, कोलकता यांना दिनांक २४/०१/२०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.
(३) लागू नाही.

---

**कठोरा-रेवसा (जि.अमरावती) मार्गावरील अळणगाव पुनर्वसन गावठाणातील भूखंडाच्या खरेदी-विक्री बाबत**

**(२१) ३४०४८ (१७-०१-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अमित झनक (रिसोड), श्री.विकास ठाकरे (नागपूर पश्चिम), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हिरामण खोसकर (इगतपूरी), श्री.संजय जगताप (पुरंदर), श्री.संग्राम थोपटे (भोर) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती शहरालगतच्या कठोरा-रेवसा मार्गावरील अळणगाव पुनर्वसन गावठाणातील रिक्त भूखंड नियमबाहयपणे कमी किंमतीत विकत घेऊन जास्त दरात भूमाफिया विक्री करत असल्याचे दिनांक ३ ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यासाठी नजीकच्या एका ग्रामपंचायतीच्या बनावट "आठ-अ" चा आधार घेतला जात असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने चौकशी करुन येथील भूमाफियांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. विजय वडेट्टीवार (०२-०३-२०२२) :** (१), (२), (३) हे खरे नाही. तथापि, दि.०३ ऑगस्ट, २०२१ रोजी वृत्तपत्रात सदर प्रकरणी बातमी प्रसिद्ध झाली. सदर बातमीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, अमरावती यांनी दिलेल्या निर्देशानुसार मौजे अळणगाव येथील पुनर्वसित गावठाणाची प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली व गाव नमुना ८ या अभिलेखाची तपासणी केली असता त्यात भूखंड क्र.१७ क्षेत्रफळ ७४० चौ.मी. हा 'रिक्त' असल्याचे दर्शविण्यात आले आहे. सदर भुखंडावर कोणतेही अतिक्रमण झालेले नाही व त्यावर कोणत्याही खाजगी व्यक्तींच्या नावाची नोंद नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संत गाडगेबाबा सहकारी सुतगिरणी मर्या.दर्यापूर (जि.अमरावती) पूर्ववत सुरु करण्याबाबत**

**(२२) ३४१०१ (०६-०१-२०२२). श्री.बळवंत वानखडे (दर्यापूर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संत गाडगेबाबा सहकारी सुतगिरणी मर्या.दर्यापूर (जि.अमरावती) या सुतगिरणीची नोंदणी दिनांक ०९ एप्रिल, १९८१ रोजी वा त्यासुमारास करण्यात आली असून सदर सुतगिरणी सुरळीत सुरु असताना सन २००७ या कालावधीत सुतगिरणीचा राज्य सहकारी बँकेच्या थकीत रकमेचा सुतगिरणीने भरणा न केल्याने गिरणीची मशीनरी जप्त केली असल्याचे निदर्शनास आले व स्वमालकीची एकूण ६०.१३ हे आर जमिनींपैकी ३० एकर शेतजमीन असून उर्वरीत जमिनीवर सुतगिरणीची इमारत व मशीनरी असून अंदाजे ८०० कामगार कार्यरत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तथापि, उक्त सुतगिरणी बंद झाल्याने मोठ्या प्रमाणावर कामगार बेरोजगार होऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली असून सदर सुतगिरणी पूर्ववत सुरु करण्याबाबत निरंतर मागणी होत असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर सुतगिरणी पूर्ववत सुरु करण्याबाबत मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांच्या अध्यक्षतेखाली सहकार मंत्री, महाराष्ट्र राज्य, वस्त्रोद्योग राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन व प्रधान सचिव, सहकार, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यांच्या प्रमुख उपस्थितीत दिनांक २१ ऑक्टोबर, २०२० रोजी वा त्यासुमारास आढावा बैठक आयोजीत करण्यात आली व तद्नंतर वस्त्रोद्योग मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १० ऑगस्ट, २०२१ रोजी वा त्यासुमारास आढावा बैठक आयोजित करण्यात आली व सदर बैठकीत सुतगिरणी पूर्ववत सुरू करण्याकरीता तांत्रिक व आर्थिक निकषानुसार व्यवहार्यता तसेच या प्रकरणातील वैधानिक अडचणीबाबत संबंधित क्षेत्रातील तज्ञांकडून तपासून घेऊन अहवाल सादर करण्याचे आदेशीत केले असल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त बैठकीत झालेल्या निर्णयानुसार याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (१६-०२-२०२२) :** (१), (२), (३) हे खरे आहे.
(४) मा.मंत्री (वस्त्रौद्योग) महाराष्ट्र राज्य यांच्या अध्यक्षतेखाली दि. १०.८.२०२१ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार सदर सहकारी सूतगिरणी पूर्ववत सुरू करण्याच्या दृष्टीने सूतगिरणीची तांत्रिक निकषानुसार व आर्थिक निकषानुसार व्यवहार्यता तसेच

या प्रकरणातील वैधानिक अडचणींबाबत संबंधित क्षेत्रातील तज्ञांकडुन तपासून घेण्याची कार्यवाही करण्याबाबत आयुक्तालयाने त्यांच्या दि. २८.२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये सूतगिरणीच्या अवसायकास कळविले आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## समाज कल्याण विभागातील वसतिगृह बंद असतांनाही खानावळीवर खर्च झाल्याबाबत

**(२३) ३४३१५ (१२-०१-२०२२). श्री.समिर मेघे (हिंगणा), डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोरोनामुळे केंद्र शासनाने दिनांक २४ मार्च २०२० रोजी वा त्यासुमारास देशात लॉकडाउन घोषित केल्यामुळे समाजकल्याण विभागाच्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांना स्वगृही पाठवून वसतिगृह बंद करण्यात आले तेव्हापासून अजूनही वसतिगृह बंद असताना २०२०-२१ या वर्षात खानावळीवर ३७ लाख ९४ हजार ४०४ रूपयांचा खर्च झाल्याचे माहे ऑगस्ट, २०२१ ला निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने कोणती चौकशी केली आहे, चौकशीत काय निष्पन्न झाले, संबंधित दोषींवर काय कार्यवाही केली वा करण्यांत येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१४-०२-२०२२) :** (१) होय, अंशत: खरे आहे. टाळेबंदी काळात इयत्ता १० वी, १२ वी, वैद्यकीय, अभियांत्रिकी व इतर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे वेळापत्रक जाहीर झाल्याने १ फेब्रुवारी, २०२१ पासून नागपूर विभागातील वसतिगृह सुरू करण्यात आलेले होते. सदर कालावधीमध्ये शासकीय वसतिगृहात वास्तव्यास असलेल्या विद्यार्थ्यांच्या भोजनासाठी रु. १२,४३,८१८/- इतकी रक्कम खर्च झालेली आहे. तसेच, नागपूर विभागातील दि.१५.३.२०२० ते दि. ३१.३.२०२० या कालावधीची कोषागारात सादर न झालेली रु.२५,५०,५८६/- एवढ्या रक्कमेची प्रलंबित देयके सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये कोषागारात सादर केल्याने एकूण रक्कम रु.३७,९४,४०४/- एवढा खर्च सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये खानावळीवर झालेला आहे.
(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**औंढा-नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील पुर्नवसित गावातील नागरिक मुलभूत नागरी सुविधांपासून वंचित असल्याबाबत**

**(२४) ३४४५२ (१२-०१-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) तालुक्यातील मौजे अंजनवाडी, सन १९७७-१९७८ मौजे कामठा सन १९५८, मौजे जोडपिंपरी सन १९५७ हया साली नदीच्या पुरामुळे बाधित होऊन सदरील गावाचे पुनर्वसन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त गांवाना निधी मिळाला नसल्याने गावे मुलभूत नागरी सुविधांपासून वंचित असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, निधी मिळावा यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मदत व पुनर्वसन राज्यमंत्री यांच्याकडे दिनांक २९ जुन, २०२१ रोजी वा त्यासुमारास निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषगाने निधी उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (११-०२-२०२२) :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) हे खरे नाही.

सन १९७६ पूर्वीच्या प्रकल्पामुळे पुनर्वसित कामठा व जोडपिंपरी या गावठाणातील नागरी सुविधा कामांच्या अंदाजपत्रकांना दि. १९/०१/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये

प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून सदर कामांसाठी पहिल्या टप्प्यात दि. ०४/०६/२०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये निधी वितरीत करण्यात आला आहे.
(३) हे खरे आहे.
(४) सदर निवेदनाच्या अनुषंगाने सदरील गावात विकास कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्याबाबत आवश्यक तो प्रस्ताव शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, हिंगोली यांना शासन पत्र दि. २४.०८.२०२१ अन्वये कळविण्यात आले आहे. त्यानुसार सविस्तर प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**जिल्हा मध्यवर्ती बँक अमरावती ने शेतकऱ्यांना कर्ज देताना**
**कापलेले शेअर्स ची रक्कम व्याजासह परत करण्याबाबत**

**(२५) ३४५५१ (१२-०१-२०२२). श्री.देवेंद्र भुयार (मोर्शी) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती जिल्हा मध्यवर्ती बँकने शेतकऱ्यांना कर्ज देताना त्यांचेकडून मंजूर कर्ज रकमेतून शेअर्सची रक्कम कापून उर्वरित रक्कम शेतकऱ्यांना अदा केली होती हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यातील बहुतांशी जिल्हा मध्यवर्ती बँक देखील हीच कार्यवाही अवलंबत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, पिक कर्ज सोबत शेअर्स वा अन्य कोणतीही रक्कम कापून घेण्यासंबंधीची तरतूद पिक कर्ज योजनेत समाविष्ट नसतानादेखील पिक कर्ज देतेवेळी शेअर्स सह विविध कामासाठी रक्कम कापून घेतल्या जात आहे हे देखील खरे आहे काय,
(४) असल्यास, पीक कर्जापोटी कापून घेतलेली रक्कम व्याजासह शेतकऱ्यांना परत न देणाऱ्या बँकांविरुद्ध शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०९-०२-२०२२) :** (१), (२), (३) व (४) अमरावती जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत थेट वैयक्तिक शेतकऱ्यांना कर्जवाटप करण्यात येत नसून, बँकेच्या सदस्य असलेल्या विविध कार्यकारी संस्थेमार्फत संस्थेच्या उपविधीमधील तरतुदीनुसार कर्जवाटप होत आहे. विविध कार्यकारी संस्थांमार्फत केल्या जाणाऱ्या पीक कर्ज वाटपावर बँक धोरण तसेच संस्था उपविधीमधील तरतुदीनूसार भाग/शेअर्स रकमेची कपात करण्यात येते. अमरावती जिल्ह्यातील सेवा सहकारी संस्थांनी ८१३ शेतकऱ्यांच्या रु. २०,००० वरील कपात केलेल्या रकमा संबंधीत शेतकऱ्यांना परत करण्याबाबत संबंधित उपनिबंधक/सहायक निबंधक, सहकारी संस्था यांनी संबंधित विविध/ सेवा सहकारी संस्थांना सुचना दिलेल्या आहेत. सदर रकमा परत करण्याची कार्यवाही संस्था स्तरावर सुरु आहे. मात्र राज्यातील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत थेट शेतकऱ्यांना पीक कर्जवाटप करीत असताना भाग रकमेची कपात केली जात नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यात आदिवासी विभागातील अनुदानित आश्रमशाळेतील मानधन तत्वावर असलेल्या पहारेकऱ्यांना शासकीय आश्रम शाळेतील पहारेकरी प्रमाणे वेतनश्रेणी देण्याबाबत**

**(२६) ३४६१२ (१२-०१-२०२२). श्री.संजय केळकर (ठाणे), डॉ.भारती लव्हेकर (वर्सोवा) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याचे कार्य करणाऱ्या अनुदानित आश्रमशाळेतील पहारेकरींवर उपासमारीची वेळ आली असल्याची बाब माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गत अनेक वर्षापासून मानधन तत्वावर चोवीस तास काम करीत असलेल्या पहारेकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे सुरक्षा कवच नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पहारेकरींच्या शिष्टमंडाने आदिवासी विकास मंत्र्यांना मागण्यांचे निवेदन देऊन शासकीय आश्रम शाळेतील पहारेकरी प्रमाणे वेतनश्रेणी देण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन मानधन तत्वावर असलेल्या पहारेकऱ्यांना शासकीय आश्रम शाळेतील पहारेकरी प्रमाणे वेतनश्रेणी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०२-०३-२०२२) :** (१) ,२), व (३) राज्य शासनाने अनुदानित आश्रमशाळेतील पहारेकऱ्यांची पदे मानधन तत्वावर निर्माण करण्याचा निर्णय दि. २३.०१.२०१४ च्या शासन निर्णयान्वये घेतला. तत्दनंतर दि. १८.०६.२०१६ च्या शासन निर्णयान्वये पहारेक-यांचे मानधन रु. ३२००/- वरुन मासिक रु. ५०००/- करण्यात आले. अनुदानित आश्रमशाळेतील पहारेक-यांच्या मानधनात वाढ करण्याबाबत अथवा त्यांना शासकीय आश्रमशाळेतील पहारेक-यांप्रमाणे वेतनश्रेणी देण्याबाबत मागणी लोकप्रतिनिधी, संस्थाचालक तसेच कर्मचारी संघटना यांच्याकडून होत आहे ही वस्तुस्थिती आहे.

(४) अनुदानित आश्रमशाळेतील पहारेक-यांची पदे मानधन तत्वावर निर्माण केली असल्याने या पदांना वेतनश्रेणी लागू करण्याची बाब सद्यस्थितीत शासन स्तरावर विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**बुलढाणा मुख्यालय भूखंडाच्या मालमत्तेची विक्री केलेल्या प्रक्रियेस स्थगिती देऊन संबधिताविरुध्द निलंबनाची कारवाई करणेबाबत**

**(२७) ३४८८० (१२-०१-२०२२). श्री.संजय गायकवाड (बुलढाणा) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१.) बुलढाणा जिल्हा कृषि व ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँक मर्या,बुलढाणा (अवसायनात) या संस्थेच्या बुलढाणा मुख्यालय भूखंडाच्या मालमत्तेची विक्री केलेल्या प्रक्रियेस स्थगिती

देऊन संबधिताविरुध्द निलंबनाची कारवाई करणेबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांना जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बुलढाणा यांनी दिनांक २ डिसेंबर, २०२० रोजीनुसार जा.क्र.जिउनि/वि१(अ)/भूविकास बॅ/ मालमत्ता विक्री/७२७०/२० नुसार पत्र दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने याबाबत काही चौकशी केली आहे काय, तसेच चौकशीत काय निष्पन्न झाले व संबंधित दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०२-०३-२०२२) :** (१) व (२) बुलडाणा भुविकास बँकेच्या बुलडाणा येथील मालमत्तेच्या विक्री प्रक्रीयेबाबत श्री. संजय गायकवाड, वि.स.स. यांनी दिलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक, बुलडाणा यांनी दि. २२.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये जिल्हा उपनिबंधक, जालना (तत्कालीन जिल्हा उपनिबंधक, बुलडाणा) यांचा खुलासा मागविला होता. सदर खुलासा प्राप्त झाल्यानंतर त्याबाबतचा अहवाल जिल्हा उपनिबंधक, बुलडाणा यांनी विभागीय सहनिबंधक, अमरावती याना सादर केला आहे.

दरम्यान सदर मालमत्तेच्या विक्री प्रक्रीयेबाबत श्री. संजय गायकवाड, वि.स.स. यांनी सहकार आयुक्त यांचेकडेदेखील तक्रार अर्ज दाखल केला होता. त्यानुषंगाने सदर अर्जातील मुद्यांबाबत चौकशी करणेसाठी सहकार आयुक्तांनी दि. ०१.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांना कळविले आहे. सहकार आयुक्तांच्या निर्देशानुसार चौकशी करण्यासाठी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांनी दि. ०२.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये जिल्हा उपनिबंधक, अकोला यांची नियुक्ती केली आहे.

शासनाने भुविकास बँकांसंदर्भात दि.२४.०७.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये घेतलेल्या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने बुलडाणा भुविकास बँक मर्या. बुलडाणा या बँकेच्या बुलडाणा येथील मालमत्तेच्या विक्री प्रस्तावास शासनाने दि. ३१.०१.२०१९ रोजीच्या आदेशान्वये मान्यता दिली होती.

शासनाच्या सदर आदेशाविरुध्द मा. उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे दाखल रिट याचिका क्र. २९७५/२०१९ व ७५१३/२०१९ मध्ये मा. न्यायालयाने दि. २१.०१.२०२२ रोजीच्या आदेशान्वये शासनाचे दि. ३१.०१.२०१९ रोजीचे आदेश रद्द केले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत**
**शेतकरी लाभापासून वंचित असल्याबाबत**

**(२८) ३४९८१ (१२-०१-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण), श्री.देवेंद्र फडणवीस (नागपूर दक्षिण पश्चिम), श्री.चंद्रकांत (दादा) पाटील (कोथरुड), श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने सन २०१९ मध्ये महात्मा ज्योतिबा फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेंतर्गत शेतकऱ्यांना दोन लाखापर्यंत रकमेची कर्जमुक्ती जाहीर केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू योजनेसाठी पात्र ठरलेल्या शेतकऱ्यांचे आधारकार्ड बँक खात्याशी जोडलेले नसल्याने, तसेच सात-बारा, गाव नमुना आठ व नावात त्रुटी असल्याने गत दोन वर्षांपासून राज्यातील तब्बल ६३ हजार ५१७ शेतकरी कर्जमुक्तीपासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, त्यानुसार योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या सर्व शेतकऱ्यांना योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०९-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत पात्र असलेल्या ३१.६८ लाख शेतकऱ्यांच्या कर्ज खात्यावर
रु. २०,२३४ कोटी इतकी कर्जमाफीची रक्कम वर्ग करण्यात आली आहे. उर्वरीत पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यांच्या आधार प्रमाणीकरणाची प्रक्रिया व त्यासंबंधीच्या तक्रारींचे निराकरण करण्याची प्रक्रिया सुरु आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उमरेड, कुही व भिवापूर तालुक्यातील शेतकऱ्यांना कर्जमाफीची रक्कम मिळणेबाबत

**(२९) ३४९८३ (१२-०१-२०२२). श्री.राजु पारवे (उमरेड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ अंतर्गत उमरेड, कुही व भिवापूर तालुक्यातील बँक शाखा निहाय कर्जमाफीस पात्र एकुण शेतकऱ्यांची संख्या व रक्कम यांची यादी देण्यात आली नाही हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या योजनेअंतर्गत शासनाने बँक मुख्यालयास प्रदान केलेली पात्र कर्ज रक्कम सबंधित बँक शाखांना आजपोवतो मिळाली नाही हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उमरेड, कुही व भिवापूर तालुक्यातील या योजने अंतर्गत एक वेळ समझौता (One Time Settlement) अंतर्गत बँकनिहाय पात्र शेतकऱ्यांची संख्या व रक्कम यांची यादी बँक शाखेला देण्यात आली नाही हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन बँक मुख्यालयास प्रदान केलेली पात्र कर्ज रक्कम सबंधित बँक शाखांना देऊन ती शेतकऱ्यांन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०९-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजना २०१७ योजनेअंतर्गत उमरेड, कुही व भिवापूर तालुक्यातील ११,३५० लाभार्थी शेतकऱ्यांना रु. ७२.४४ कोटी कर्जमाफीचा लाभ देण्यात आला. प्रोत्साहनपर योजनेअंतर्गत ४,३५७ लाभार्थी शेतकऱ्यांना रु. ८.९५ कोटी रक्कमेचा लाभ देण्यात आला आहे. तसेच एकरकमी परतफेड योजनेअंतर्गत २,२२५ लाभार्थी शेतकऱ्यांना २३.३५ कोटी रक्कमेचा लाभ देण्यात आला आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील राष्ट्रीयकृत बँका, सहकारी बँका, नागरी बँका शेतक-यांना कर्ज देताना रिजर्व्ह बँकेच्या परिपत्रकाचे उल्लंघन करीत असल्याबाबत**

**(३०) ३४९८९ (१२-०१-२०२२). श्री.विक्रमसिंह सावंत (जत) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) रिझर्व्ह बँक ऑफ इंडियांने पीक कर्ज देण्यासाठी बँक अधिका-यांनी कोणती कागदपत्रे मागावीत याबबात दिनांक ३० एप्रिल, २००७ रोजी परिपत्रक काढून त्यात स्पष्ट सूचना दिल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, बँक अधिकारी पीक कर्ज वाटप करताना रिजर्व बँकेच्या परिपत्रकाचे उल्लंघन करुन पीक कर्जासाठी शेतातील उभे पीकच तारण असते परंतू पीक कर्जासाठी बँक अधिकारी बेबाळी प्रमाणपत्र, ७/१२, ८ अ, सर्च रिपोट, फेरफार नक्कल, जमिनीचे मुल्यांकन, स्टॅप पेपर आणि रिजस्टर्ड गहाणखत मागत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, इंडियन बँक, इंडसइंड बँक, कोटक महिंद्रा, डी.सी.बी.बँक, जिल्हामध्यवर्ती शेतक-यांची बँक असून या बँकेने ४४ टक्के इतके पीक कर्ज वाटप केले तसेच एकूण राज्यात खरिप हंगामासाठी उद्दीष्टाच्या केवळ ३४ टक्के पीक कर्ज वाटप करण्यात आले, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या परिपत्रकाचे उल्लंघन करणाऱ्या बँक अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे, तसेच शेतकऱ्यांना पीक कर्ज देण्याबाबत कोणती उपायोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (११-०२-२०२२) :** (१) व (२) रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांचेकडील परिपत्रक दिनांक ३०.०४.२००७ अन्वये सिमांत व लहान शेतकऱ्यांना द्यावयाच्या रु. ५० हजार पर्यंतच्या शेती कर्जासाठी बँकांनी "बाकी नसल्याचे" प्रमाणपत्र शक्यतो न घेण्याबाबत व सबंधीतांकडून स्वघोषणापत्र घेण्याबाबत बँकांना सुचित केले आहे. तसेच सदर परिपत्रकामध्ये भुमिहीन शेतमजूर, खंडाने शेती करणारे/वाटेकरी व तोंडी कराराद्वारे शेती करणाऱ्या शेतकऱ्यांना कर्ज देतांना बँकांना कागदपत्रांची अडचण येत असल्याने बँकांनी कर्जपुरवठा करतांना स्थानिक प्रशासन/ पंचायतराज संस्था यांचेकडील संबंधीतांमार्फत पीक

उत्पादनाबाबतचे प्रमाणपत्र घ्यावे असे सुचित केले आहे. सदर परिपत्रकामध्ये बँकांनी शेती/ पीक कर्जासाठी अन्य कोणती कागदपत्रे घ्यावीत याबाबत रिझर्व्ह बँकेमार्फत उल्लेख करण्यात आलेला नाही.

याबाबत राज्यस्तरीय बँकर्स समितीने दिनांक ०४.०४.२०१९ रोजीच्या पत्राद्वारे शेती कर्जासाठी साधारणपणे आवश्यक कागदपत्रांचा तपशिल खालील प्रमाणे कळविला आहे.

- ८ अ नुसार सर्व ७/१२, ६-ड फेरफार, सर्व गट क्रमांकाची सिमा.
- बँकेच्या पॅनेलवरील वकीलांकडून कायदेशीर शोध अहवाल, साधारणतः एक लाखापेक्षा जास्त रक्कमेच्या कर्जासाठी.
- अर्जदार /सहअर्जदार KYC
- सर्व आवश्यक कागदपत्रांसह योग्यरित्या पुर्ण अर्ज.
- निर्धारीत प्रारुपामध्ये वैयक्तिक माहिती.

याबाबत राज्यस्तरीय बँकर्स समितीने संदर्भीय पत्राद्वारे कळविले आहे की, रु. १.६० लाखावरील शेती कर्जासाठी राज्य शासनाच्या मुद्रांक शुल्क नियमातील तरतूदींनुसार शेतजमिन गहाणखत करण्यात येते.

(३) हे खरे नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**महाराष्ट्र शासनाच्या सामुहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत मिळणाऱ्या सवलतीबाबत**

**(३१) ३५०४९ (१२-०१-२०२२). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र शासनाने कृषि उद्योगांना चालना देण्यासाठी सामुहिक प्रोत्साहन योजना सन २०१९ पासून लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर योजनेमध्ये प्राथमिक कृषि प्रक्रिया उद्योग उदा.प्रीकुलिंग व कोल्ड स्टोअरेज उभारणी करणे या उद्योगांना अनुदान न देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सामुहिक प्रोत्साहन योजना हि पूर्वलक्षी प्रभावाने राबविण्यात यावी अशा प्रकारची मागणी माहे ऑगस्ट, २०२० मध्ये वा त्यादरम्यान लोकप्रतिनिधींनी शासनाकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या अनुषंगाने माहे फेब्रुवारी २०२१ मध्ये वा त्या दरम्यान कृषीमंत्री यांचे अध्यक्षतेखाली बैठक देखील घेण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, शितगृहाना अनुदान देण्याच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येणार आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (१०-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

प्रचलित धोरणानुसार उत्पादन प्रक्रीया करणारे कृषी प्रक्रिया उद्योग हे सदर योजनेच्या विहित अटी व शर्ती पूर्ण करित असलेल्या घटकांना योजनेचा लाभ अनुज्ञेय आहे.

(३) होय, हे खरे आहे.

लोकप्रतिनिधींनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने शासन स्तरावर निर्णय होवून दि.३१ ऑगस्ट, २०२० च्या शासन निर्णयामधील तरतुदींमध्ये सुधारणा करण्याबाबतचे शासन पूरक पत्र दि.०८ सप्टेंबर,२०२१ रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

(४) होय, हे खरे आहे.

(५) सदर बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही

---

**आदिवासी विकास विभागांतर्गत माडा पौकेट व मिनी माडा**
**मध्ये नव्याने गावांच्या समावेश करण्याबाबत**

**(३२) ३५०५७ (१२-०१-२०२२). श्री.दिलीपराव बनकर (निफाड) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास विभागांतर्गत माडा पौकेट व मिनी माडा मध्ये निफाड तालुक्यातील काही गावांचा नव्याने समावेश करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी आयुक्त, आदिवासी विकास यांचेकडे माहे मार्च, २०२० मध्ये वा त्यादरम्यान निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने केंद्र शासनास शिफारस करून माडा पौकेट व मिनी माडा मध्ये गावे समावेश करण्याबात कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (०८-०२-२०२२) : (**१) होय,

(२) मा.राष्ट्रपती महोदय यांच्याद्वारा महाराष्ट्र राज्याच्या अनुसूचित क्षेत्राबाबत दि.२ डिसेंबर १९८५ रोजी अधिसूचना काढण्यात आलेली आहे. त्यामुळे सद्यस्थितीत महाराष्ट्र राज्याच्या अनूसूचित क्षेत्राची पुर्नरचनेचा करणे आवश्यक आहे. अनूसूचित क्षेत्रात गावांचा समावेश करण्यासाठी केंद्र शासनाने काही निकष निश्चित केले आहेत. सदर निकषांनुसार आयुक्त, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांच्यामार्फत राज्याच्या अनुसूचित क्षेत्राच्या पुर्नरचनेचा प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## हिंगोली जिल्हयात महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ शेतकऱ्यांना मिळाला नसल्याबाबत

**(३३) ३५२०९ (१२-०१-२०२२). श्री.चंद्रकांत ऊर्फ राजुभैय्या रमाकांत नवघरे (बसमत) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्हयात महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत ९१,४६६ शेतकऱ्यांच्या खात्यावर ५९४ कोटी ८७ लाख रुपयांचा निधी माहे जुलै, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान वर्ग करण्यांत आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महात्मा ज्योतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ अद्यापही १० हजार शेतकऱ्यांना मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दहा हजार शेतकऱ्यांना कर्जमुक्ती चा लाभ मिळण्याच्या दृष्टिने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०९-०२-२०२२) :** (१), (२) व (३) महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना २०१९ अंतर्गत हिंगोली जिल्हयामध्ये आधार प्रमाणिकरण पुर्ण झालेल्या सभासदांपैकी ९२,३७९ सभासदांना रु. ६००.८३ कोटीचा लाभ देण्यात आलेला असून उर्वरीत पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची प्रक्रिया सुरू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देताना झालेला गैरव्यवहार

**(३४) ३५२५४ (१२-०१-२०२२). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगाव (जि.नाशिक) तालुक्यात गतवर्षात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानग्रस्तांना नुकसान भरपाई देताना अपात्र लोकांना अनुदान वाटप करुन कोटयावधी रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन संबधित दोषीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१८-०२-२०२२) :** (१) माहे जून ते ऑक्टोबर, २०२० मध्ये झालेल्या अतिवृष्टी व पूरपरिस्थितीमुळे नाशिक जिल्हयातील मालेगाव तालुक्यातील ३३ टक्के पेक्षा

जास्त शेतीपिके व बहुवार्षिक पिके यांना देय असलेली व वितरीत केलेली मदतीची रक्कम ३३% पेक्षा कमी नुकसान झालेल्या शेतीपिके व बहुवार्षिकपिके यांच्या नुकसानीपोटी देण्यात आल्याचे जिल्हाधिकारी, नाशिक यांनी नियुक्त केलेल्या अपर जिल्हाधिकारी, मालेगाव यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या प्राथमिक अहवालात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे.

(२) व (३) सदर प्रकरणाची चौकशी करण्यासाठी अपर जिल्हाधिकारी, मालेगांव यांचे अध्यक्षेतेखाली गठीत केलेल्या समितीच्या अहवालातील पुढील कार्यवाही जिल्हाधिकारी, नाशिक यांचेमार्फत करण्यात येणार आहे.

---

**राज्यातील अनुसूचित जातीच्या मुलांसाठी असलेल्या १६५ विनाअनुदानित शाळांना अनुदान मिळण्याबाबत**

**(३५) ३५२८३ (१२-०१-२०२२). श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जातीच्या मुलांसाठी असलेल्या १६५ विनाअनुदानित शाळांना अनुदान मिळण्यासाठी संस्थाचालक दबाव निर्माण करीत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शाळा या कागदावर असून प्रत्यक्षात काही ठिकाणी शाळेच्या जागी शाळेचा फक्त बोर्ड उभा आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थी व शिक्षकांच्या नोंदी देखील कागदावरच आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (१४-०२-२०२२) :** (१), (२) ,व (३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यात टास्क फोर्स तयार करण्याबाबत**

**(३६) ३५३४७ (१२-०१-२०२२). श्री.नानाभाऊ पटोले (साकोली), श्री.सुरेश वरपुडकर (पाथरी), श्रीमती सुलभा खोडके (अमरावती), श्रीमती प्रतिभा धानोरकर (वरोरा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आरोग्यविषयक टास्क फोर्सच्या धर्तीवर उद्योग विश्वासाठी एक टास्क फोर्स तातडीने उभारण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने यापुढील कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२५-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

औद्योगिक कामगारांसाठी मोठ्या प्रमाणात लसीकरण करणे, आवश्यक प्रतिबंधात्मक

उपाययोजना करुन उद्योग व्यवसाय सुरू ठेवणे, कंपनीच्या आवारातच कर्मचाऱ्यांकरिता तात्पुरत्या निवासस्थानांची व्यवस्था करणे इत्यादी उपाययोजना करण्याकरिता कोविड - १९ महामारीच्या पार्श्वभूमीवर नामांकित उद्योगांचे प्रतिनिधी व राज्य सरकारचे संबंधित विभागाचे प्रमुख यांचा एक कार्यबल गट (Task Force) मा.मंत्री (उद्योग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २६/०७/२०२१ च्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आला आहे.
(२) व (३) कोविड काळात राज्यातील जनतेला अत्यावश्यक सेवा व जीवनावश्यक बाबींचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी, शासन व उद्योग यांच्यात समन्वय साधण्याकरिता या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आलेल्या कार्यबल गटाने मदत केली. तसेच राज्यातील उद्योजकांनी सामाजिक जबाबदारीच्या नात्याने मुखपट्टया, सॅनिटायझर्स, टेस्टींग किटस, पी.पी.ई किटस, व्हेंटीलेटर्स, फुड पॅकेटस इत्यादी स्वरुपात मदत केली. तसेच ऑक्सीजन निर्मीतीमध्ये स्वयंपूर्ण होण्याच्या शासनाच्या धोरणाला प्रतिसाद देवून उद्योगांनी ऑक्सीजन पी.एस.ए प्लांटसची स्थापना, ऑक्सीजन कॉन्सनट्रेट्स व ऑक्सीजन कंटेनर्स पूरविण्यासाठी मदत केली.

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उद्योगांच्या सहकार्याने राज्याच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये सुमारे ९० कोविड तपासणी केंद्रे, सुमारे ३५ विलगीकरण केंद्रे व सुमारे ४० लसीकरण केंद्रे स्थापन केली. तसेच सुमारे ५० उपहार गृहांमार्फत कामगारांना मोफत भोजन पुरविण्यात आले. कोविड महामारीच्या पार्श्वभूमीवर गठीत करण्यात आलेल्या या कार्यबल गटाची राज्यामध्ये गुंतवणूक वाढविण्यासाठी नियोजन करण्यात मदत झाली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**रब्बी हंगामातील कर्ज वाटप बाबत**

**(३७) ३५४५६ (१२-०१-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात राष्ट्रीयकृत तसेच खाजगी बँकाद्वारे खरीप हंगामाच्या कृषी कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण झाले नसल्याचे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्यात रब्बी हंगामाच्या पिक कर्जाचे वाटप वेळेत होण्यासाठी शासनाकडून विशेष अभियान राबवले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, रब्बी हंगामातील कृषीकर्ज वाटपाचे उद्दिष्ट व कर्ज घेणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या याबाबतची आकडेवारी शासनाकडे उपलब्ध आहे काय,
(४) असल्यास, कृषी कर्ज वाटपाचे उद्दिष्ट पूर्ण होण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (०९-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) सन २०२०-२१ मधील रब्बी हंगामासाठी २१.४३ लाख शेतकऱ्यांना रु. १९८७१ कोटी इतक्या पीककर्ज वाटपाचा लक्षांक निश्चीत करण्यात आला आहे. त्यापैकी १,७०,३६१ शेतकऱ्यांना रु. १८४९.४६ कोटी इतके कर्जवाटप केलेले आहे. रब्बी हंगामातील पीक कर्जवाटप अद्याप चालु आहे. रब्बी हंगामातील पीककर्ज वाटपाच्या अनुषंगाने राज्यस्तरीय बँकर्स समितीच्या कृषी उपसमितीच्या सभेमध्ये बँकांना तसेच परिपत्रकाद्वारे क्षेत्रीय अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना दिलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सामाजिक न्याय विभागाअंतर्गत चालविल्या जाणा-या मागासवर्गीय वसतीगृहातील कार्यरत अधिक्षकांना शासन सेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्याबाबत**

**(३८) ३५८२३ (१२-०१-२०२२). श्री.सुधीर मुनगंटीवार (बल्लारपूर) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१). सामाजिक न्याय विभागाअंतर्गत चालविल्या जाणा-या मागासवर्गीय वसतीगृहातील कार्यरत अधिक्षकांना शासन सेवेत कायमस्वरूपी सामावून घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी बल्लारपूर यांनी दिनांक २९ ऑक्टोबर, २०२१ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदन सादर केले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०४-०३-२०२२) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) सदर पद हे मानधन तत्वावर मंजूर असल्याने त्यास वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रस्ताव विचाराधीन नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी-मोरगांव क्षेत्रातील आदिवासी वन निवासी यांना वन हक्क पट्टे वाटप करण्याबाबत**

**(३९) ३५९७५ (१२-०१-२०२२). श्री.मनोहर चंद्रिकापूरे (अर्जुनी-मोरगांव) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) गोंदिया जिल्ह्यातील अनुसुचित जमाती व इतर पारंपारिक वननिवासी यांना मालकी पट्टे अधिनियम, २००६, २००८ व २०१२ अधिनियमांनुसार भुधारकांची १० हजारांपेक्षा जास्त प्रकरणे जिल्हाधिकारी गोंदिया यांच्याकडे प्रलंबित ठेवून नाकारण्यात आली आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अर्जुनी मोरगांव विधानसभा क्षेत्राचे लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी गोंदिया व उपविभागीय अधिकारी यांचेकडे बैठका घेवून सदर प्रकरणी तात्काळ जमीन पट्टयांचे वाटप

होण्याकरीता निर्देश देऊनही याबाबत कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हेही खरे आहे काय,
(३) असल्यास, अतिक्रमीत जमिनीवर पिकवलेले अन्न धान्य विक्री करण्यास संबंधित विभागाने प्रतिबंध केलेला आहे, हे खरे आहे काय,
(४) असल्यास, वनहक्क कायद्यानुसार अतिक्रमीत जमिनीचे सर्व पट्ट्यांचे वाटप आयुक्त आदिवासी विकास, नाशिक यांनी आढावा घेवून विशेष मोहिम अंतर्गत निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे?

**ॲड. के.सी.पाडवी (०८-०२-२०२२) :** (१) हे खरे नाही.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी (वनहक्कांची मान्यता) अधिनियम, २००६ व नियम २००८ आणि सुधारणा नियम २०१२ च्या अंमलबजावणीनुसार गोंदिया जिल्ह्यात एकूण प्राप्त २१७३९ वैयक्तिक दाव्यांपैकी ८६३९ दावे मंजूर करण्यात आले आहेत. वनहक्क कायद्यातील निकषांची पुर्तता होत नसल्याने ग्रामस्तरीय वनहक्क समिती, उपविभाग स्तरीय वनहक्क व जिल्हास्तरीय वनहक्क समितीस्तरावरून एकूण १२८०५ दावे अपात्र झाले आहेत.
(२) वनहक्क कायद्यातील तरतूदीनुसार, उपविभाग स्तरीय व जिल्हास्तरीय वनहक्क समितीवर ३ अशासकीय सदस्यांचे नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.

गोंदिया जिल्ह्यातील जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत येणा-या पचायत समित्यांच्या कालावधी दि.११ जुलै, २०२० रोजी संपुष्टात आल्याने उपविभाग व जिल्हास्तरीय वनहक्क समितीवरील ३ अशासकीय सदस्याअभावी समितीची गणपुर्ती पुर्ण होत नाही. त्यामुळे दोन्ही स्तरावरील समितीची सभा सदर कालावधीपासून आयोजित करता आलेली नाही. त्यामुळे प्रलंबित दावे, अपिल यावर निर्णय होऊ शकलेला नाही. मंजुर झालेल्या प्रकरणांमध्ये पट्टे वाटपाची कार्यवाही करण्यात आलेली आहे.
(३) हे खरे नाही.
(४) व (५) उपविभाग व जिल्हास्तरीय वनहक्क समितीवरील अशासकीय सदस्यांच्या नामनिर्देशनानंतर सदर समितीची गणपुर्ती पुर्ण झाल्यावर प्रलंबित दावे, अपिलांवर कार्यवाही करणे शक्य आहे.

---

## मौजे माणगांव (ता.शाहूवाडी जि.कोल्हापूर) येथील ओढ्याला पुर आल्याने शेतकऱ्यांचे नुससान झाल्याबाबत

**(४०) ३६०१७ (१२-०१-२०२२). डॉ.डॉ.विनय विलासराव कोरे (सावकर) (शाहूवाडी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे माणगांव, (ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर) येथील गावठाणाच्या हद्दीतील असलेल्या ओढ्याला पावसाळात पुर आल्याने ओढ्याच्या काठाच्या जवळ असलेल्या शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुर येवून ओढ्याचे क्षेत्र बदलल्यामुळे तेथील शेतकऱ्यांच्या जमिनी वाहून गेल्यामुळे ७/१२ धारक भूमिहीन झाले असून त्यांच्या जमिनी अन्य गावांतील शेतकरी जमिनी कसत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अल्प भूधारक भूमिहीन शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनी परत देण्यासाठी शासनाने अद्याप कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे सदर गावातील शेतकऱ्यांच्या मनांत असंतोष निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१८-०२-२०२२) :** (१) अंशत: खरे आहे,

मौजे माणगाव, ता. शाहुवाडी, जि. कोल्हापूर येथील गावाढाणापासून आकुर्ळे गावातून वारणा नदीला मिळणाऱ्या ओढयाला अतिवृष्टी झाल्याने ओढया लगत असलेल्या एकूण २७ शेतक-यांचे १.८५ आर इतके क्षेत्र वाहून गेल्यामुळे नुकसान झाले आहे. सदर वाहून गेलेले क्षेत्र हे पडीक क्षेत्र असून, सदर ओढयाने पात्र बदलून जमिन वाहून गेल्याची घटना साधारणत: ३० वर्षापासून घडत आहे. सदरची जमीन चालू अथवा मागील वर्षी वाहून गेलेली नाही.

(२) खरे नाही,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## उमरखेड (जि.यवतमाळ) तालुक्यात कापूस पणन महासंघाचे खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत

**(४१) ३६०३९ (१२-०१-२०२२). श्री.नामदेव ससाने (उमरखेड) :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमरखेड (जि.यवतमाळ) येथे कापूस पणन महासंघाचे खरेदी केंद्र सुरु करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २७ ऑगस्ट, २०२१ रोजीच्या व त्या सुमारास सहकार व पणन मंत्री यांना लेखी निवेदन देण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणता निर्णय घेतला आहे काय, त्यांचे स्वरुप काय आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१७-०२-२०२२) :** (१) होय.

सद्यस्थितीत खुल्या बाजारात कापसाचे दर केंद्र शासनाने घोषित केलेल्या किमान हमी दरापेक्षा (MSP) बराच जास्त असल्याने कापूस पणन महासंघाकडून किमान हमी दरावर कापूस खरेदी होत नाही.

(२) मा.लोकप्रतिनिधींकडून प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने, भविष्यात हमी दराने कापूस खरेदीसाठी, उमरखेड, जि.यवतमाळ येथे कापूस खरेदी केंद्र सुरु करण्याच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत, कापूस पणन महासंघ व पणन संचालक यांना कळविण्यात आले आहे. तसेच सदर कार्यवाहीबाबत मा.लोकप्रतिनिधी यांना दि.०२.०२.२०२२ च्या पत्रान्वये अवगत करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**किन्हाळा व अरततोंडी (ता.देसाईगंज, जि.गडचिरोली) या पुनर्वसन गावातील नागरीकांचे पुनर्वसन कर्ज माफ करण्याबाबत**

**(४२) ३६०८८ (१२-०१-२०२२). श्री.कृष्णा गजबे (आरमोरी) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गाढवी नदी काठावरील किन्हाळा व अरततोंडी, (ता.देसाईगंज, जि.गडचिरोली) या दोन्ही गावांचे सन १९९४ मध्ये मोहटोला व चिखली रीठ येथे पुनर्वसन करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोन्ही गावांचे पुनर्वसन करतांना पुरग्रस्तांना १० हजार रुपयाची रोख मदत व १५ हजार रुपये कर्ज स्वरुपात उपलब्ध करण्यात आलेले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोन्ही गावातील पुरग्रस्तांना देण्यात आलेले १५ हजार रुपयाचे कर्जाचे व्याजासह लाखो रुपये अजुनही वसुल करण्यात येत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करुन पुरग्रस्तांचे पुनर्वसन कर्ज माफ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विजय वडेट्टीवार (१८-०२-२०२२) :** (१) खरे आहे.

(२) खरे आहे.

(३) खरे आहे.

किन्हाळा गावातील १५७ पूरबाधीत शेतकरी व बिगर शेतकऱ्यांना एकूण रू.२०,८२,०००/- इतके घरबांधणी कर्ज वाटप करण्यात आले आहे अद्यापपर्यंत व्याजासह रू.१,४४,०१५/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली असून थकबाकी व व्याजासह मिळून रू.२४,२९,९७०/- वसूल होणे बाकी आहे.

तर अरततोंडी गावातील ११८ पूरबाधित शेतकरी व बिगर शेतकरी यांना एकूण १६,०२,०००/- एवढे घरबांधणी कर्ज वाटप करण्यात आले आहे त्यापैकी अद्यापपर्यंत व्याजासह रू.३,६६,५८०/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली असून थकबाकी व व्याजासह मिळून रू.१६,१८,५३५/- वसूल होणे बाकी आहे.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ई-कॉमर्स कंपन्यांना प्रोत्साहन देणे बाबत**

**(४३) ३६१२८ (१२-०१-२०२२). श्री.रोहित पवार (कर्जत जामखेड) :** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ई-कॉमर्स कंपन्यांचा व्यवसाय कोरोना काळात वाढला असून येणाऱ्या काळात या क्षेत्रात होणारी वाढ बघता रोजगाराच्या मोठ्या संधी उपलब्ध होणार असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ई-कॉमर्स क्षेत्रात भविष्यात उपलब्ध होणाऱ्या रोजगार संधींचा आपल्या राज्यातील युवकांना देखील लाभ मिळावा यासाठी तसेच या क्षेत्रातील कंपन्यांना राज्यात व्यवसाय वाढीसाठी प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने राज्य सरकार धोरण आखत आहे काय,
(३) असल्यास, ई-कॉमर्स क्षेत्राचा राज्यातील छोटे दुकानदार, व्यापारी यांच्यावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करून छोटे दुकानदार, व्यापारी यांना देखील ई-कॉमर्स क्रांतीचा लाभ व्हावा यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुभाष देसाई (२५-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे. कोरोना काळात प्रवास व हालचालींवर मर्यादा आल्याने घरपोच सेवा देणाऱ्या ई-कॉमर्स कंपन्यांचे कामकाज पूरक ठरल्याने, ई-कॉमर्स कंपन्यांच्या व्यवसायात वाढ होवून, या क्षेत्रात रोजगाराच्या संधी मोठया प्रमाणात उपलब्ध झालेल्या आहेत.
(२) औद्योगिक उपक्रमात एकूण उपलब्ध रोजगारापैकी ८० टक्के रोजगार हे स्थानिक लोकांना उपलब्ध होण्यासाठी राज्य शासनाने दिनांक दि. १७/११/२००८ रोजी शासन निर्णय निर्गमित केला आहे. राज्य शासनाच्या सदर निर्णयामुळे ई-कॉमर्स व संलग्न उद्योग क्षेत्र / सेवा क्षेत्र उदा. लॉजिस्टीक्स, पॅकेजिंग, सप्लाय चैन इ. अंतर्गत स्थानिक युवक / युवतींना रोजगार संधी उपलब्ध होण्यासाठी मदत होईल.
(३) ई-कॉमर्स, रिटेल सेक्टर सहित सर्व क्षेत्रातील कार्यरत उद्योग व्यवसाय क्षेत्रासाठी राज्य शासनाने मैत्री पोर्टल (Single Window Clearance) उपलब्ध करुन विविध परवाने , दाखले ना-हरकत प्रमाणपत्र ऑनलाईन देण्याची सुविधा व्यवसाय सुलभीकरण (EODB) उपक्रमांतर्गत उपलब्ध करुन दिली असून त्याचा लाभ राज्यातील व्यवसायिकांना व उद्योजकांना होत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### मातंग समाजाच्या जात व पोट जातीचे सर्वेक्षण करून अहवाल तयार करण्याबाबत

**(४४) ३६१५४ (१२-०१-२०२२). श्री.सुनिल कांबळे (पुणे कॅन्टोन्मेंट) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मातंग समाजाच्या जात व पोट जातीचे सर्वेक्षण करून अहवाल तयार करण्याबाबत बार्टीचे महासंचालक यांना स्थानिक लोकप्रतिनिधींनी यांनी एका वर्षापूर्वी विंनती करूनही अद्याप पर्यंत अहवाल तयार केला नसल्याचे माहे ऑक्टोबर, २०१९ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मातंग समाजाला न्याय देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (०९-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे

मा. श्री. सुनिल ज्ञानदेव कांबळे, विधानसभा सदस्य यांचे पत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांना दि.१२.१०.२०२० रोजी प्राप्त झाले आहे. त्याअनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्या नियामक मंडळाच्या दिनांक २२ जानेवारी, २०२१ रोजीच्या बैठकीत राज्यातील अनुसूचित जातीच्या सर्व शासकीय योजनांचे बेंचमार्क सर्वेक्षण तसेच पथदर्शी सर्वेक्षणास मान्यता देण्यात आलेली आहे. या सर्वेक्षणामध्ये अनुसूचित जातीतील सर्व ५९ जातींचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, कौटुंबिक, शासकीय योजनांचे लाभ घेण्याचे प्रमाण इत्यादी बाबींची माहिती संकलीत करण्यात येणार आहे. राज्यातील अनुसूचित जातींच्या सर्व शासकीय योजनांचे बेंचमार्क सर्वेक्षणामध्ये मातंग समाजाचाही समावेश असून या सर्वेक्षणातून मातंग समाजाबाबतही माहिती प्राप्त होईल.

(२) कोविड-१९ च्या प्रादुर्भावामुळे प्रत्यक्ष सर्वेक्षणाचे काम प्रतिक्षाधिन होते. परंतु सद्यस्थितीत कोविडची परिस्थिती निवळली असल्याने विभागनिहाय ७ गावांमध्ये पथदर्शी सर्वेक्षण सुरु आहे. टप्प्या-टप्प्याने संपूर्ण राज्यभर सर्वेक्षण प्रस्तावित आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कैकाडी समाजाचे क्षेत्रबंधन उठवून संपूर्ण राज्यामध्ये अनुसूचित जाती प्रवर्गात समावेश करण्याबाबत**

**(४५) ३६३७५ (१२-०१-२०२२). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **सामाजिक न्याय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील काही भागात कैकाडी समाजाचा समावेश अनुसूचित जातीमध्ये असून, पश्चिम महाराष्ट्रामध्ये या समाजाला विमुक्त जाती व भटक्या जमाती या वर्गामध्ये गणले जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे या समाजातील नागरीकांना इतरत्र वर्गात गणले जात असल्याने अनुसूचित जाती प्रवर्गासाठी असलेल्या आरक्षणाचा व सेवा सुविधांचा लाभ मिळण्यास अडचणी निर्माण होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी संपूर्ण राज्यामध्ये कैकाडी समाजाचा समावेश अनुसूचित जाती प्रवर्गात करण्याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. धनंजय मुंडे (११-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

राज्यात अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, नागपूर, वर्धा व यवतमाळ जिल्हे व राजूरा तालुका सोडून चंद्रपूर जिल्ह्यात कैकाडी समाजाचा समावेश अनुसूचित जाती (अ.क्र.२८)

मध्ये असून उर्वरीत राज्यात कैकाडी समाजाचा समावेश “विमुक्त जाती-अ”(अ.क्र.४) मध्ये आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) होय, हे खरे आहे. संपूर्ण राज्यामध्ये कैकाडी समाजाचा समावेश अनुसूचित जाती प्रवर्गात करण्याबाबतचा प्रस्ताव दि.७.१०.२०१४ तसेच दि.१७.०७.२०२० रोजीच्या शासनपत्रान्वये केंद्र शासनाकडे सादर करण्यात आला होता.

(४) दि.१७.०७.२०२० रोजीच्या शासन पत्रान्वये सादर करण्यात आलेला प्रस्ताव केंद्र शासनकडून अमान्य करण्यात आला आहे.

संपूर्ण राज्यामध्ये कैकाडी समाजाचा समावेश अनुसूचित जाती प्रवर्गात करण्याबाबत केंद्र शासनाकडे पुनश्च शिफारस करण्यासंदर्भात महाराष्ट्र विधिमंडळाने दि.६ जुलै, २०२१ रोजी ठराव संमत केला असून त्याअनुषंगाने दि.२३.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये केंद्र शासनास प्रस्ताव पुन्हा: सादर करण्यात आलेला आहे.

---

**यवतमाळ जिल्ह्यात आदिवासी मुला-मुलींचे वसतिगृह बांधण्याबाबत.**

**(४६) ३६४२७ (१२-०१-२०२२). डॉ.संदीप धुर्वे (अर्णी) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात आदिवासी विकास विभागातंर्गत यवतमाळ जिल्ह्यामध्ये पांढरकवडा व पुसद असे दोन प्रकल्प कार्यालय कार्यान्वित असून यामध्ये पांढरकवडा कार्यालया अंतर्गत पांढरकवडा, वणी,घाटंजी,झरीजामणी,राळेगांव, यवतमाळ, कळंब या तालुक्यांचा समावेश आहे, तर पुसद कार्यालया अंतर्गत पुसद, उमरखेड, महागांव, दिग्रस, दारव्हा व आर्णी या तालुक्यांचा समावेश आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आदिवासी विकास विभागाच्या वार्षिक अर्थसंकल्पानुसार पांढरकवडा कार्यालयासाठी १२५ कोटी तर पुसद कार्यालयासाठी ७५ कोटीं निधींची तरतूद करण्यात आली, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पांढरकवडा कार्यालया अंतर्गत १० मुलांचे व ९ मुलींचे असे एकूण १९ वसतिगृह कार्यरत आहेत तर पुसद कार्यालया अंतर्गत मुलांचे ६ व मुलींचे ५ वसतीगृह असे एकूण ११ वसतिगृह आहेत, हे खरे आहेत काय,

(४) असल्यास पांढरकवडा व पुसद कार्यालयातंर्गत मुला मुलींच्या किती वसतिगृहांचे बांधकाम करण्यात आले तसेच किती वसतिगृह भाड्याने घेण्यात आले असून दरवर्षी त्यासाठी किती रुपये भाडयापोटी खर्च करण्यात येतात,

(५) असल्यास, भाड्यापोटी कोट्यवधी रुपये खर्च करण्याऐवजी वसतिगृहांच्या स्वतंत्र इमारतींचे बांधकाम न करण्याची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (२८-०२-२०२२) :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे नाही. तथापि, सन २०२१-२२ या वित्तीय वर्षासाठी जिल्हा वार्षिक आदिवासी

उपयोजनेंतर्गत पांढरकवडा प्रकल्प कार्यालयासाठी ७१.०१ कोटी तर पुसद प्रकल्प कार्यालयासाठी २८.३९ कोटी ची तरतूद करण्यात आली आहे.

(३) हे खरे आहे.

(४) पांढरकवडा प्रकल्पांतर्गत एकूण १९ शासकीय वसतिगृहे कार्यरत असून त्यापैकी ४ वसतिगृहे शासकीय इमारतीमध्ये व १५ वसतिगृहे ही भाड्याच्या इमारतीमध्ये कार्यरत आहेत. प्रस्तुत वसतिगृहाच्या भाड्यापोटी सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात रु. १.५२ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

पुसद प्रकल्पांतर्गत एकूण ११ शासकीय वसतिगृहे कार्यरत असून त्यापैकी १ वसतिगृह शासकीय इमारतीमध्ये व १० वसतिगृहे ही भाड्याच्या इमारतीमध्ये कार्यरत आहेत. सदर वसतिगृहाच्या भाड्यापोटी वार्षिक रु. ८२.०५ लक्ष इतका खर्च होतो.

(५) यवतमाळ जिल्ह्यातील १ वसतिगृहाचे बांधकाम पूर्ण झाले असून ५ वसतिगृहाचे बांधकाम सुरु आहे. ४ वसतिगृहाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याचे नियोजन आहे. उर्वरीत वसतिगृहासाठी शासकीय जागा उपलब्ध करुन घेण्याबाबतची कार्यवाही प्रकल्पस्तरावर सुरु आहे.

---

**परदेशी शिष्यवृत्ती योजनेच्या राखीव जागा वाढविण्याबाबत**

**(४७) ३६४९३ (१२-०१-२०२२). श्री.मोहन मते (नागपूर दक्षिण) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना विदेशात शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यभरातून दरवर्षी केवळ दहा विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येत असल्याने अनेकं पात्र विद्यार्थी या योजनेच्या लाभापासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मागील चार वर्षात विदर्भातून केवळ एकाच विद्यार्थ्याला सदरहू योजनेचा लाभ मिळाला असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरहू योजनेपासून वंचित राहणाऱ्या अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सदरहू योजनेच्या राखीव जागा वाढविण्याबाबत शासनाने कोणता धोरणात्मक निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१५-०२-२०२२) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

सन २०१८-१९ ते सन २०२१-२२ या वर्षात विदर्भातून एकूण पाच विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ मंजूर करण्यात आला आहे.

(४) अनुसूचित जमातीच्या मुला-मुलींना परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती या योजनेंतर्गत दरवर्षी एकूण १० विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्तीचे लाभ देण्यात येतात. सदर योजना सन

२००५-२००६ पासून कार्यान्वित असून आजतागायत एकाही शैक्षणिक वर्षामध्ये सदर योजनेंतर्गत पात्र असलेल्या एकूण १० लाभार्थ्यांचा लक्षांक पूर्ण झालेला नाही. यास्तव, सदरहू योजनेचा लक्षांक /कोटा वाढविण्याबाबत अद्‌याप निर्णय घेण्यात आलेला नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

**सोलापूर जिल्ह्यातील सहकारी संस्थांची लेखापरिक्षण अहवाल अपूर्ण असल्याबाबत**

**(४८) ३६५४५ (१२-०१-२०२२). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सोलापूर जिल्ह्यातील १ हजार ७०३ सहकारी संस्थांनी लेखापरिक्षण अहवाल सादर केलेला नसून ४ हजार ४३९ संस्थांचा लेखापरीक्षण अहवाल अपूर्ण असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू लेखापरिक्षण पूर्ण करण्याची मुदत माहे डिसेंबर, २०२१ असूनही सहकारी संस्थांनी लेखापरिक्षण अहवाल सादर केल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रस्तुत प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, तद्नुसार चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, तसेच लेखापरिक्षण सादर न केलेल्या सहकारी संस्थांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (१०-०२-२०२२) :** (१) हे अंशतः खरे आहे.
सन २०२०-२१ या आर्थिक वर्षामध्ये माहे डिसेंबर २०२१ अखेर सोलापूर जिल्हयातील एकूण ५०७० संस्थांपैकी २३११ संस्थांचे लेखापरिक्षण पुर्ण झालेले असून २७५९ संस्थांचे लेखापरिक्षण अद्‌याप पूर्ण झालेले नाही.
(२) होय.
शासन अधिसूचना, दिनांक ०१.१०.२०२१ अन्वये दिनांक ३१ डिसेंबर, २०२१ पर्यंत लेखापरीक्षण पुर्ण करण्यासाठी मुदतवाढ देण्यात आली आहे.
(३) लेखापरिक्षण अहवाल सादर करण्याची बाब अकाली टप्प्यावर असल्याने संस्थेवर कारवाई करण्यात आलेली नाही. संस्थांचे लेखापरिक्षण तात्काळ पुर्ण करणेबाबत, जिल्हा विशेष लेखापरिक्षक वर्ग-१, सहकारी संस्था, सोलापूर यांनी दि.१७.०१.२०२२ च्या पत्रान्वये संबंधीत लेखापरिक्षकांना नोटीस दिलेली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## सांगली जिल्ह्यात कापसाच्या कृत्रिम टंचाई आणि साठेबाजीमुळे वस्त्रोद्योग संकटात सापडल्याबाबत

**(४९) ३६५८४ (१०-०१-२०२२). श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **वस्त्रोद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील मोठे कापूस उद्योजक आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या कापसाच्या कृत्रिम टंचाई आणि साठेबाजीमुळे यावर्षी वस्त्रोद्योग संकटात सापडल्याचे माहे ऑक्टोबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विकेंद्रीत यंत्रमाग लघुउद्योग नामशेष होण्याचा धोका निर्माण झाल्याचे यंत्रमाग संघ इचलकरंजी, विटा, भिवंडी यांनी व्यक्त केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी केंद्राने तातडीने लक्ष घालण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अस्लम शेख (२३-०२-२०२२) :** (१) होय.

(२) होय

(३) राज्यातील यंत्रमागधारकांच्या समस्यांचा अभ्यास करुन त्यावर उपाययोजना शोधण्यासाठी वस्त्रोद्योग क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींची समिती दि.०२.०२.२०२२ रोजीच्या शासन निर्णयान्वये स्थापन करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही

---

## नांदुरा नगर परिषदेच्या हद्दीतील आदिवासी घरकुल योजनेस पात्र असणाऱ्या नागरिकांना घरकुल मंजूर करण्याबाबत

**(५०) ३६६४२ (१२-०१-२०२२). श्री.राजेश एकडे (मलकापूर) :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदुरा नगर परिषदेच्या हद्दीत निवास करणाऱ्या तसेच शहरी आदिवासी घरकुल योजनेस पात्र असणाऱ्या नागरिकांना घरकुल मिळण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २७ ऑगस्ट २०२१ रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने एकात्मिक आदिवासी विकास विभाग यांनी घरकुल मंजूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**ॲड. के.सी.पाडवी (१५-०२-२०२२) :** (१) होय.

(२) प्रधानमंत्री आवास योजनेच्या धर्तीवर आदिवासी विकास विभागाच्या दिनांक १५.०३.२०१६ च्या शासन निर्णयान्वये शबरी आदिवासी घरकुल योजनेची अंमलबजावणी ग्रामविकास विभागाच्या अधिनस्त राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचेकडून करण्यात येत

आहे. त्याच धर्तीवर शहरी भागातील घरकुल कार्यक्रमाची अंमलबजावणी गृहनिर्माण विभागाच्या अधिनस्त म्हाडामार्फत करण्याच्या अनुषंगाने अभिप्रायाकरीता गृहनिर्माण विभागास नस्ती सादर करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.